पुणे.
दिनांक: ७/०८/२०१७

<u>प्रसिध्दी पत्रक</u>

दिनांक ९/०८/२०१७ रोजी मुंबई येथे मराठा क्रांती मोर्चाचे आयोजन करण्यांत आले आहे. संपूर्ण राज्यभरातून मोठया संख्येने मराठा बांधव सहभागी करुन हा मोर्चा यशस्वी करण्याचा संयोजकांचा मानस आहे.

या मोर्चात सामील होण्यासाठी पुणे शहर, ग्रामीण तसेच आजूबाजूचे सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, अहमदनगर, औरंगाबाद, लातून तसेच मराठवाडा व विदर्भातील इतर जिल्हयांमधून मोठया संख्येने मराठा बांधव मिळेल त्या साधनाने मुंबईला पोहचणार आहेत. यामध्ये चारचाकी वाहनांतून मुंबई पर्यंत प्रवास करणा-या मोर्चेकरी बांधवांची संख्या फार मोठी असणार आहे. पर्यायाने दिनांक ८/०८/२०१७ च्या साधारणतः सायंकाळपासून ते दिनांक ९/०८/२०१७ रोजी मुंबईकडे जाणा-या सर्वच प्रमुख रस्त्यांवर मोर्चेक-यांच्या चारचाकी वाहनांची संख्या अतिशय जास्त असणार आहे.

पुणे तसेच आजूबाजूच्या जिल्हयांमधून मुंबईकडे मोर्चामध्ये सामील होण्यासाठी जाणारी वाहने कोल्हापूर - सातारा - पुणे - मुंबई या द्रुतगती महामार्गानेच जातील. या महामार्गावर नेहमीच सर्वच प्रकारच्या वाहनांची वर्दळ मोठया प्रमाणावर असते. यामध्येच मराठा मोर्चासाठी मुंबईला जाणारी वाहने आल्यास या द्रुतगती महामार्गावरील वाहनांच्या संख्येत प्रचंड वाढ होऊन ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कोंडीमुळे या द्रुतगती मार्गावरुन नित्याचा प्रवास करणारे व मुंबईला मोर्चासाठी जाणारे नागरिकांची गैरसोय देखील होऊ शकते.

दिनांक ८/०८/२०१७ व दिनांक ९/०८/२०१७ या दोन दिवशी मुंबई द्रुतगती मार्गावर वाहतुकीची कोंडी होऊ नये म्हणून पोलीस विभागातर्फे आवश्यक तो बंदोबस्त लावण्यात येणारच आहे. तसेच इतर आवश्यक व्यवस्थाही करण्यात येणार आहे.

द्रुतगती मार्गाचा नेहमी वापर करणारे सर्व सामान्य नागरिक यांची गैरसोय होऊ नये व मोर्चासाठी मुंबईला जाणा-या नागरिकांना सुलभतेने मुंबईला पोहचून मोर्चामध्ये सामील होता यावे यासाठी आपल्या नित्याच्या कामाने मुंबईला जाणा-या नागरिकांनी दिनांक ९/०८/२०१७ रोजी या द्रुतगती महामार्गांचा वापर टाळावा असे आवाहन पोलीस विभागातर्फे करण्यात येत आहे.